जिल्हाधिकारी कार्यालय सांगली
क्र.पुशा/चारा/टंचाई/कावि १८५/१२
सांगली - ०३/०४ /२०१२

# जाहीर निविदा सुचना

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे करिता व त्यांचे वतीने जिल्हाधिकारी सांगली, यांचे कडून सांगली जिल्हयातील जत, आटपाडी, कवठेमहांकाळ, खानापूर-विटा, कडेगांव, तासगांव, पलूस, मिरज या तालुक्यामध्ये उघडण्यात येणाऱ्या चारा डेपोना माहे एप्रिल २०१२ ते ३० जून २०१२ अगर पावसाचे प्रमाण समाधानकारकरित्या होईपर्यंत आवश्यकतेनुसार

१) फक्त वाळलेला चारा (वाळलेला चारा/ ज्वारी अथवा हायब्रीड ज्वारीचा कडबा अथवा कडबा कुटटी ) पुरवठा करणेसाठी मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत .तसेच

२) वैरण विकास कार्यक्रमांतर्गत लागवड केलेला ओला चारा, मका, कडवळ अथवा शेतकऱ्यांनी लावलेलस चारा, ऊस इत्यादी शेतातुन तोडणे, वजन करणे, ट्रक मध्ये भरणेत येवुन तहसिलदार यांचे मागणीप्रमाणे चारा डेपोवर वाहतुक करणे, वजन करून शेतकऱ्यांना वाटप करणे हे सर्व काम करणेसाठीचे प्रती टन व प्रती किलोमीटर चे दर ठरविणेबाबत स्वतंत्र मोहोरबंद निविदा मागविणेत येत आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | निविदा फॉर्म मिळणेचे ठिकाण | : | जिल्हाधिकारी कार्यालय, ( पुरवठा शाखा) सांगली |
| २. | निविदा फॉर्मची किंमत | : | जिल्हाधिकारी सांगली यांचे नावे काढलेला र. रु. १०००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डी. डी. (नापरतावा) |
| ३. | कोऱ्या निविदा फॉर्म मिळण्याचा कालावधी | : | दिनांकः ०४/०४/२०१२ ते ११/०४/२०१२ (कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यन्त |
| ४. | मोहोरबंद निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक, वेळ व ठिकाण | : | दिनांकः १२/०४/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, ( पुरवठा शाखा) सांगली |
| ५. | मोहोरबंद निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | : | दिनांकः १३/०४/२०१२ रोजी दुपारी ४.०० वाजता. |
| ६. | मोहोरबंद निविदा उघडण्याचे ठिकाण | : | जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली |

सदर निविदाचे संपूर्ण अटी व शर्ती जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, सांगली तसेच जिल्हाधिकारी सांगली यांचे वेबसाईट www.sangli.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आली आहे.

निविदेच्या अटी व शर्ती जिल्हाधिकारी कार्यालय ( पुरवठा शाखा) सांगली येथे कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अथवा पूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी सांगली यांनी राखून ठेवलेले आहेत. वरील प्रमाणे दोन स्वतंत्र कामे असलेने प्रत्येक कामासाठी ठेकेदारांनी दोन्ही वेगवेगळया निविदा दर भरणे आवश्यक राहील.

**सही /-**
**जिल्हाधिकारी सांगली**

# जिल्हाधिकारी कार्यालय सांगली

**वैरण विकास कार्यक्रमांतर्गत लागवड केलेला ओला चारा, मका, कडवळ अथवा शेतकऱ्यांनी लावलेला चारा, ऊस इत्यादी शेतातुन तोडणे, वजन करणे, ट्रक मध्ये भरणेत येवुन तहसिलदार यांचे मागणीप्रमाणे चारा डेपोवर वाहतुक करणे, वजन करून शेतकऱ्यांना वाटप करणे हे सर्व काम करणेसाठीचे प्रती टन व प्रती किलोमीटर चे दर ठरविणेबाबत**

## निविदा अर्ज

**निविदा क्रमांक ---------**

**अर्जदाराचे / संस्थेचे / फर्मचे नाव : ------------------------**

**संपूर्ण पत्ता : --------------------------------------------**
**--------------------------------------------**
**--------------------------------------------**

**अर्जदाराचे / संस्थेचे / फर्मच्या प्रमुखाची स्वाक्षरी /-**

# जिल्हाधिकारी कार्यालय सांगली

## वाळलेला चारा (वाळलेला चारा/ ज्वारी अथवा हायब्रीड ज्वारीचा कडबा अथवा कडबा कुटटी ) पुरवठा करणेसाठी प्रती टन व प्रती किलोमीटर चे दर ठरविणेबाबत

## निविदा अर्ज

**निविदा क्रमांक ---------**

**अर्जदाराचे / संस्थेचे / फर्मचे नाव : ------------------------**

**संपूर्ण पत्ता : --------------------------------------------**
**--------------------------------------------**
**--------------------------------------------**

**अर्जदाराचे / संस्थेचे / फर्मच्या प्रमुखाची स्वाक्षरी /-**

# परिशिष्ट -१

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे करिता व त्यांचे वतीने जिल्हाधिकारी सांगली, यांचे कडून सांगली जिल्हयातील जत, आटपाडी, कवठेमहांकाळ, खानापूर-विटा, कडेगांव, तासगांव, पलूस, मिरज या तालुक्यामध्ये उघडण्यात येणाऱ्या चारा डेपोना माहे एप्रिल २०१२ ते ३० जून २०१२ अगर पावसाचे प्रमाण समाधानकारकरित्या होईपर्यंत आवश्यकतेनुसार (१) फक्त वाळलेला चारा (वाळलेला चारा/ ज्वारी अथवा हायब्रीड ज्वारीचा कडबा अथवा कडबा कुटटी ) पुरवठा करणेसाठी मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत .तसेच (२) वैरण विकास कार्यक्रमांतर्गत लागवड केलेला ओला चारा, मका, कडवळ अथवा शेतकऱ्यांनी लावेला चारा, ऊस इत्यादी शेतातुन तोडणे, वजन करणे, ट्रक मध्ये भरणेत येवुन तहसिलदार यांचे मागणीप्रमाणे चारा डेपोवर वाहतुक करणे, वजन करून शेतकऱ्यांना वाटप करणे हे सर्व काम करणेसाठीचे प्रती टन व प्रती किलोमीटर चे दर ठरविणेबाबतच्या निविदेच्या अटी व शर्ती.

**१. व्याख्या :**

१. कराराच्या संज्ञेचा अर्थ पुढील प्रमाणे असेल आणि तीत निविदा कारांना सुचना निविदा तीची परिशिष्टे निविदेचा स्विकार आणि करारनाम्याच्या नमुनेवजा प्रपत्रात निर्देशिलेल्या अटी धरुन निविदेत ज्याची भर घालता येईल अशा सर्वसाधारण किंवा विशेष अटी यांचा समावेश होतो.

२. 'शासन' या संज्ञेचा अर्थ राज्यशासन आणि महाराष्ट्राचे राज्यपाल यांचा समावेश होतो.

३. 'महाराष्ट्राचे राज्यपाल' या संज्ञेचा अर्थ त्यांचा उत्तराधिकारी आणि अभिहस्तांकिती असा असेल व तीत त्यांचा समावेश होईल.

४. जिल्हाधिकारी जिल्हा सांगली' या संज्ञेचा अर्थ जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी असा असेल.

५. 'ठेकेदार' या संज्ञेत ज्यांच्याशी करार करण्यात आला आहे. त्या व्यक्तींचा किंवा व्यक्तींच्या भागीदारी संस्थेचा किंवा कंपनीचा समावेश असेल त्यात ज्या भागीदारी संस्थेची किंवा कंपनीशी करार करण्यात आला असेल तिच्या वारस संस्थेचा किंवा कंपनीचा समावेश असेल ठेकेदार नैसर्गिक व्यक्ती असेल त्याबाबतीत वारस मृत्यूपत्र व्यवस्थापक आणि कारभारी कंपनीचा समावेश असेल यथास्थिती महामंडळाच्या बाबतीत धंदयाचे उत्तराधिकारी आणि त्यांचे अनुज्ञात अभिहस्तांकिती यांचा समावेश असेल.

६. 'कंत्राटाचे दर' : या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्यासाठी व त्यांच्या वतीने जिल्हाधिकारी जिल्हा सांगली यांनी स्विकारलेल्या कामाच्या बाबीसाठी दयावयाचे दर.

**२. कराराची उदिष्टे :** ठेकेदार सर्व किंवा कोणत्याही सेवा करील आणि जेंव्हा आवश्यक असेल आणि जिल्हाधिकारी जिल्हा सांगली किंवा त्यांच्यावतीने काम करणारा अधिकारी वेळोवेळी निदर्शनास आणून देईल त्याप्रमाणे सर्व कर्तव्ये व जबाबदाऱ्या व त्यावरील जिल्हाधिकारी जिल्हा सांगली किंवा त्यांच्या वतीने काम करणारा अधिकारी हे निर्देशित करतील अशी सहायकारी आणि अनुषंगिक कर्तव्ये, सेवा आणि कार्ये यथोचितरित्या पार पाडील अशी सेवा करणे व अशी कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडणे हे प्रत्यक्षात पुरवठा होत असलेल्या चाऱ्याशी संबंधित आहे व त्या गोष्टी जनतेचा ज्यात हितसंबंध आहे अशी सार्वजनिक कर्तव्ये किंवा कृत्ये असल्याचे समजण्यात येईल.

**३. कंत्राटाचे पक्षकार :**

**(अ)** कंत्राटाचे पक्षकार ठेकेदार व महाराष्ट्राचे राज्यपाल हे राहतील.

**(ब)** निविदेवर किंवा निविदेचा भाग असणाऱ्या कोणत्याही इतर दस्ताऐवजाचा दुसऱ्या व्यक्तीचा किंवा एखादया भागीदारी संस्थेच्या वतीने सही करणारी व्यक्ती, त्या करारासंबंधी या सर्व बाबतीत यथास्थिती अशा इतर व्यक्तीस किंवा भागीदारी संस्थेस बांधून घेण्याचा त्याला प्राधिकार आहे अशी खात्री देत असल्याचे मानण्यात येईल. सबंधित व्यक्तीस असा कोणताही प्राधिकार नाही असे चौकशीअंती आढळून आल्यास जिल्हाधिकारी यांच्या मार्फत प्रतिनीधीत्व केलेले महाराष्ट्राचे राज्यपाल यांना इतर दिवाणी व फौजदारी उपाययोजनांना हानी न पोहोचविता कंत्राट रद्द करता येईल आणि असा रद्द करण्याचा परिणाम म्हणून झालेला सर्व खर्च व नुकसान भरपाई देण्यास सही करणाऱ्यास जबाबदार धरतील.

**(क)** महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्यावतीने दयावयाचे नोटीसा किंवा करावयाची कोणतीही इतर कारवाई जिल्हाधिकारी सांगली किंवा त्या प्रयोजनार्थ यथोचितरित्या प्राधिकृत केलेला व त्यांच्यावतीने कार्य करणारा कोणताही इतर अधिकारी करू शकेल.

**४. कामाचे परिणाम :-** शासन कोणत्यावेळी किंवा कंत्राटदाराच्या संपुर्ण मुदतीत कामाचे कोणतेही निश्चित परिणाम किंवा सेवेच्या कोणत्याही विशिष्ट स्वरुपाचे हमी देत नाही. या कंत्राटात कामाच्या कोणत्याही बाबीचा केवळ निर्देश केलेला आहे. यावरुन त्या सर्व किंवा त्यापैकी कोणतीही बाब यासंबंधिचे काम अपरिहार्यपणे किंवा केवळ त्या ठेकेदाराकडेच सोपविण्यात आले पाहिजे अशी मागणी करण्याचा ठेकेदाराकडे कोणताही अधिकार प्रदान केला जात नाही. शासनास याखाली नमूद केलेल्या कोणत्याही किंवा सर्व सेवांसाठी एक किंवा अधिक ठेकेदाराची नियुक्ती करण्याचा व शासन ठरविल अशा रितीने अशा ठेकेदारांमध्ये कामाची विभागणी करण्याचा पूर्ण अधिकार असेल आणि कामाची अशी विभागणी केल्यामुळे झालेली हानी किंवा नफा याबद्दल किंवा अन्यथा शासनाविरुध्द कोणताही दावा दाखल करता येणार नाही.

**५. ठेकेदाराची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या :-**

**(१)** जिल्हाधिकारी सांगली किंवा त्यांच्यावतीने काम करणारे अधिकारी यांचे समाधान होईल अशा रितीने चाऱ्याचे / कार्यक्षम परिवहन करण्याचा आणि कामाची अचूक व अदयावत स्थिती, माहिती , प्रगती विवरणे, हिशोब पुरविण्याच्या दृष्टीने ठेकेदार सक्षम व पुरेसा कर्मचारी वर्ग कामावर ठेवतील. ठेकेदार त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या वर्तनाबाबत जबाबदार राहतील व त्यांची स्वत:ची त्यांच्या नोकरांची किंवा अधिकाऱ्यांची अथवा प्रतिनीधींची हयगय, निष्कळजीपणा, नैपुण्यात अभाव किंवा गैरवर्तन यामुळे उद्‌भवणाऱ्या नुकसानीबाबत शासनाची भरपाई करतील. जिल्हाधिकारी सांगली यांच्यामते ठेकेदाराचा जो कोणताही कर्मचारी काम सुरळीतपणे पार पाडण्यास अडथळा करीत असेल त्या कर्मचाऱ्यास बडतर्फ करण्याची मागणी करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यास असेल आणि ठेकेदार त्यांचे नोकर किं वा अभिकर्ते अथवा प्रतिनीधी यांची हयगयी व गैरकृत्य वर्तणूक इत्यादीमुळे उद्‌भवलेल्या हानीविषयीचा त्यांचा निर्णय अंतिम असेल व तो ठेकेदारावर बंधनकारक राहील.

**(२)** ठेकेदार कंत्राटाच्या व रोजच्या कामात त्यांच्यावतीने कार्य करण्यास प्राधिकृत केलेल्या किंवा अधिक जबाबदार प्रतिनीधीची नाव/ नावे जिल्हाधिकारी, सांगली यांना कळवावीत. जिल्हाधिकारी, सांगली यांच्या किंवा त्यांच्या वतीने कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कार्यालयास दररोज भेट देणे आणि ने आण करण्याच्या कार्यक्रमाविषयी माहिती मिळविण्याकरीता अशा अधिकाऱ्यांशी सर्वसाधारणपणे संपर्क साधणे आणि काम इत्यांदीचा प्रगती अहवाल देणे व सामान्यपणे त्याबाबतीत सुचना मिळविणे हे त्या प्रतिनीधीचे कर्तव्य असेल.

**(३)** परिवहनाचे काम करीत असताना ठेकेदार, पोलीस व नगरपालिका प्राधिकरणाचे सर्व नियम व विनीयम यांचे काटेकोरपणे पालन करतील.

**(४)** जेव्हा जेव्हा जिल्हाधिकारी, सांगली यांनी किंवा त्यांच्यावतीने कार्य करणाऱ्या अधिकाऱ्याने फर्माविले असेल तेंव्हा तेंव्हा या कंत्राटात तपशिलवार दिलेल्या व त्यातुन उद्भवणाऱ्या सर्व किंवा कोणत्याही सेवा कोणत्याही जादा परिश्रमिकाकडून रात्रीसुध्दा पार पाडण्यास ठेकेदार जबाबदार असेल.

**६. वजावट :-** या कंत्राटान्वये येणे असलेल्या दयावयाच्या कोणत्याही रकमा (त्यांना परत करावयाची अनामत देय धरून ) शासनाला विनीयोग करता येईल व ठेकेदाराने शासनाशी केलेल्या कोणत्याही इतर कंत्राटातून किंवा त्यामुळे उद्भवलेली कोणतीही रक्कम देण्याबाबतच्या शासनाची कोणतीही मागणीची त्यातुन वजावट करता येईल.

**७. विलंब,संप इत्यादी :-** ठेकेदाराच्या नियमाबाहेरील कारणामुळे उद्भवलेल्या विलंबाबद्दल ठेकेदार जबाबदार राहणार नाही. त्याबाबतीत जिल्हाधिकारी सांगली यांचा निर्णय अंतिम असेल. ठेकेदार व त्यांचे कामगार यांच्यामधील वेतनाविषयीच्या किंवा इत्यादी कोणत्याही तंटयामुळे ठेकेदारांच्या कामगारांनी केलेल्या संपामुळे झालेला विलंब हा ठेकेदाराच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे झालेला विलंब असल्याचे मानण्यात येणार नाही. व त्या कारणामुळे शासानाची जी कोणतीही हानी किंवा नुकसान सहन करावी लागेल. त्याबद्दल ठेकेदार जबाबदार राहतील.

**८. लाच,आळूत, लाच म्हणून उपहार इत्यादी :-** ठेकेदार किंवा त्यांचा कोणताही एक किंवा अनेक भागीदार, संचालक, व्यक्ती किंवा नौकर याने त्यांच्या वतीने किंवा त्याबाबततीत कोणत्याही अन्य व्यक्तीने कंत्राटाच्या संबंधात कोणत्याही व्यक्तींना कोणत्याही रितीने अनुग्रह किंवा इतराजी दाखविण्याबद्दल किंवा परावृत्त करण्याबद्दल शासनाचा कोणताही अधिकारी, नोकर, प्रतिनीधी किंवा अभिकर्ता यांना किंवा त्यांच्या अथवा त्यावतीने कोणत्याही व्यक्तीला कोणतीही लाच, आळूत, उपहार किंवा लाभ दिला असेल त्याचे वचन दिले असेल किंवा देवू केला असेल तर त्यामुळे शासनाला हे कंत्राट रद्द करण्याचा हक्क आहे आणि अशा रद्द करण्यामुळे उद्भवणारी कोणतीही हानी किंवा नुकसानी देण्याबद्दल ठेकेदाराकडून मागणी करता येईल.

**९. हिशोब :**

**(अ)** कंत्राटाच्या संबंधित पार पाडावयाच्या कार्याविषयीचे सर्व हिशोब, पुस्तके, कागद पत्रके व दस्त ऐवज जिल्हाधिकारी, सांगली यांना किंवा त्यांच्या वतीने कार्य करणाऱ्या अधिकाऱ्याला तपासण्यासाठी व हिशोब तपासणीसाठी प्रति स्वाक्षरी करण्यासाठी खुली असतील.

**(ब)** जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील अशी वा कंत्राटान्वये केलेल्या कामाविषयीची विवरणपत्रे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व त्या संस्थेच्या प्रतिसह विहित करण्यात येईल अशा अंतराने ठेकेदार पुरवतील.

**१०. परिश्रमिक :-**

**(अ)** ठेकेदाराने पार पाडलेल्या सेवांच्या संदर्भात ठरविलेल्या दराची परिश्रमिक मिळण्याचा ठेकेदारांना अधिकार असेल.

**(ब)** कंत्राटात व त्या सोबत जोडलेल्या अनुसुचित विविधरित्या तरतूद केलेल्या सेवा शिवाय बाबी कोणत्याही सेवा पार पाडण्यास ठेकेदारांना फर्माविण्यात आले असेल तर त्याबद्दल ठेकेदारांना कंत्राटाचे परिश्रमिक सेवा परस्पर कराराव्दारे वाटाघाटी करून ठरविण्यात येतील. अशा दराने देण्यात येईल.

**(क)** कंत्राटात विशेषरित्या वर्णिलेल्या व तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही सेवामध्ये एखादया विशिष्ट सेंवांचा समावेश होतो किंवा नाही किंवा अशा कोणत्याही सेवेतला सहायक किंवा अनुशंगिक आहे किंवा नाही या प्रश्नाचा अपर जिल्हाधिकारी सांगली यांच्याकडून निर्णय करण्यात येईल आणि तो निर्णय अंतिमरित्या ठेकेदारावर बंधनकारक राहिल.

**(ड)** जी कोणतीही विशिष्ट सेवा पार पाडण्याबद्दल ठेकेदारांना फर्मावण्यात आले असेल त्या सेवेच्या कंत्राटात विशेषरित्या तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही सेवांमध्ये समावेश होत नाही किंवा यथास्थितीत सेवांना सहायक अथवा अनुषंगिक नाही अशी लेखी अभिवेदन जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे करण्याचा ठेकेदारांना अधिकार असेल. मात्र असे लेखी अभिवेदन अशा सेवा प्रत्यक्ष पार पाडावयास सुरूवात केल्यापासून १५ दिवसाच्या आत केले पाहिजे. असे लेखी अभिवेदन उक्त वेळेच्या आत दिले नाही तर या बाबतीत ठेकेदाराचा अभिप्राय सोडून देण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

**११. <u>रक्कम देणे</u> :-**

**(अ)** ठेकेदारांनी वाहतूक केलेली चाऱ्याबाबत यथास्थित जिल्हाधिकारी सांगली यांनी किंवा त्यांच्या वतीने कार्य करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेली परिवहन पास व कार्यपूर्ती प्रमाणपत्रे यांनी यथोचितरित्या पुष्टी देवून विहीत नमुन्यातील देयकाच्या दोन प्रति सादर केल्यावर जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालाकडून पैसे देण्यात येतील.

**(ब)** जमानत ठेव ठेकेदारांना लवकर परत करणे सुकर व्हावे यासाठी ठेकेदारांनी कंत्राट समाप्त झाल्याच्या तारखेपासून २ महिन्याहून उशिरा नसेल अशा कालावधीत त्यांची सर्व देयकेसादर केली पाहिजेत.

**(क)** कोणत्याही कारणास्तव चुकत्या न केलेल्या देयकांच्या रकमेवर कोणतेही व्याज देण्यास शासन जबाबदार असणार नाही.

**१२. <u>जमानत ठेव</u> :-**

**(१)** ठेकेदार त्यांची निविदा स्विकारल्यानंतर करारनामा करण्यापूर्वी रूपये २,००,०००/- (दोन लाख रूपये फक्त) इतकी जमानत राष्ट्रीकृत बँकेच्या धनाकर्ष (डी. डी.) स्वरुपात ठेवतील. तसे न केल्यास ते कंत्राट ठेकेदारांच्या जोखमीवर त्यांच्या खर्चाचे आणि कंत्राटाच्या अटिनुसार जिल्हाधिकारी, सांगली यांना असलेल्या अशा इतर अधिकाराच्या व उपाययोजनेच्या अधिन रद्द केले जाण्यास पात्र होईल. उक्त ठेवी त्यावर कोणतेही व्याज मिळणार नाही.

**(२)** जमानत ठेव अपूरी असेल त्याप्रसंगी किंवा जमानत ठेव पूर्णपणे सरकार जमा करण्यात आली असेल तर वसुली योग्य एकूण रकमेपैकी शिल्लक राहिलेली रक्कम या कंत्राटान्वये किंवा शासनाबरोबर केलेल्या कोणत्याही इतर कंत्राटाच्या ठेकेदारांना त्यावेळी देय असेल किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी संपूर्ण रकमेची भरपाई करण्यास पुरेशी नसेल तर ठेकेदार उरलेली रक्कम मागणी केल्यास शासनाला ताबडतोब देतील. देय होईल अशा कोणत्याही रकमेतून वजा करण्यात येईल.

**१३.** शासनास त्यांच्या कोणत्याही इतर अधिकारास व उपाय योजनांना हानी न पोचता या कंत्राटामुळे शासनाला येणे असलेल्या किंवा वसूल करता येण्यासारख्या सर्व रकमा व त्या रकमा ज्या तारखेपासून शासनाला देय होतील त्या तारखेपासून दर साल दर <u>शेकडा बारा टक्के इतके व्याज जमिन महसूलाची थकबाकी असल्याप्रमाणे ठेकेदाराकडून</u> वसूल करण्याचा अधिकार असेल.

ठिकाण :- ( निविदाकाराची स्वाक्षरी)

तारीख :- / /२०१२ ज्या नात्याने सही करीत आहात ते ज्ञाते

# परिशिष्ट २

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे करिता व त्यांचे वतीने जिल्हाधिकारी सांगली, यांचे कडून सांगली जिल्हयातील जत, आटपाडी, कवठेमहांकाळ, खानापूर-विटा, कडेगांव, तासगांव, पलूस, मिरज या तालुक्यामध्ये उघडण्यात येणाऱ्या चारा डेपोना माहे एप्रिल २०१२ ते ३० जून २०१२ अगर पावसाचे प्रमाण समाधानकारकरित्या होईपर्यंत आवश्यकतेनुसार (१) फक्त वाळलेला चारा (वाळलेला चारा/ ज्वारी अथवा हायब्रीड ज्वारीचा कडबा अथवा कडबा कुटटी ) पुरवठा करणेसाठी मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत .तसेच (२) वैरण विकास कार्यक्रमांतर्गत लागवड केलेला ओला चारा, मका, कडवळ अथवा शेतकऱ्यांनी लावेला चारा, ऊस इत्यादी शेतातुन तोडणे, वजन करणे, ट्रक मध्ये भरणेत येवुन तहसिलदार यांचे मागणीप्रमाणे चारा डेपोवर वाहतुक करणे, वजन करून शेतकऱ्यांना वाटप करणे हे सर्व काम करणेसाठीचे प्रती टन व प्रती किलोमीटर चे दर ठरविणेबाबतच्या निविदेच्या अटी व शर्ती.

**(जिल्हाधिकारी कार्यालय सांगली )**

१. चाऱ्याचा पुरवठ्यास तसेच चारा वाहतुकीबाबत आवश्यकतेप्रमाणे आदेश देणेत येतील ही आवश्यकता जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्रधिकृत केलेले अधिकारी ठरवतील. याबाबत कंत्राटदारास एकुण किती चारा पुरवावा लागेल हे भविष्यात होणाऱ्या चारा टंचाई परिस्थितीवर अवलंबुन राहील.

२. चारा पुरवठा करण्याकरीता वाहतूकीच्या वाहनांची स्वच्छता राखणे, दुरूस्त ठेवणे व जनावरांना खाण्यास योग्य अशा सकस चाऱ्याचा पुरवठा करणे यासाठी कंत्राटदार जबाबदार राहतील.

३. पुरविलेल्या चाऱ्याबाबत साठवणुक रजिस्टरमध्ये साठा नोंद तसेच प्रत्येक वाहनाची रोजनिशी जिल्हाधिकारी यांनी नेमून दिलेले सक्षम अधिकारी हे ठरवतील पुरवठयाबाबत संबंधित सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतरच देयक आदा केले जाईल.

४. पुरवठादार यांनी पुरवठा केलेला चारा जनावरांना खाण्यास योग्य असलेबाबत समक्ष अधिकारी यांचे प्रमाणपत्र दिल्याशिवाय कंत्राटदार यांना देयकाची आदायगी करता येणार नाही.

५. प्रत्येक चारा डेपोमध्ये चाऱ्याचे नमुना ठेवणे आवश्यक आहेत. त्याचप्रमाणे चाऱ्याचा पुरवठा करणे बंधनकारक आहे.

६. चारा पुरवठा करताना होणाऱ्या नुकसानीबाबत जसे अपघात आग लागणे किंवा इतर नैसर्गिक अथवा मानवनिर्मितआपत्तीमुळे कंत्राटदाराच्या होणाऱ्या नुकसानिबाबतची भरपाई कंत्राटदाराला दिली जाणार नाही.

७. कंत्राटदारांनी स्पष्ट लेखी आदेश नसताना चारा पुरवठा केल्यास त्याबाबतचा मोबदला देता येणार नाही.

८. चारा पुरवठा व वाहतुकीबाबत शासनाकडुन उपलब्ध होणाऱ्या अनुदानानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे चारा पुरवठा पूर्ण झाल्यानंतर देयके कार्यालयास सादर केलेनंतर नियमानुसार देयकांची छाननी करून रक्कमा वितरीत करण्यात येतील.

९. जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा संबंधीत तालुकेचे तहसिलदार यांनी आदेश दिल्यानंतर चारा पुरवठा न केल्यास अथवा विलंबाने केल्यास पुरवठा आदेशाच्या दिनाकापासून २४ तासानंतर प्रतिदिन रुपये १०,०००/-(अक्षरी रूपये दहा हजार फक्त) किंवा जिल्हाधिकारी निश्चित करतील त्या दराने दंडाची अकारणी होईल.

१०. जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत प्रतिनिधी यांनी आदेश दिल्यानंतर चारा पुरवठा न केल्यास अथवा चारा पुरवठयाचे काम असमसधानकारक असल्याचे आढळून आल्यास किंवा निविदेतील कोणत्याही अटीचा भंग केल्यास कंत्राटदारास दिलेले काम काढून घेण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना राहिल व चारा पुरवठयासाठी दुसऱ्या कंत्राटदाराकडून काम करुन घेतले जाईल. परिणामी होणाऱ्या नुकसानीची भरपाई संबंधित पुरवठाधारकाकडून वसूल करणेत येईल.

११. कंत्राटदारास निविदेच्या कालावधीत दररोज काम देणे बंधनकारक राहणार नाही. आवश्यकतेनुसार चारा पुरवठा आदेश देण्यात येतील. सांगली जिल्ह्यातील निर्माण होणाऱ्या चारा टंचाई परिस्थितीनुसार तालुक्यातील चारा डेपो संख्यामध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

१२. शासकीय नियमावलीत वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार अथवा प्रशासकीय आदेशाप्रमाणे होणाऱ्या बदलानुसार जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांनी केलेल्या सूचना व अटीचे पालन करणे पुरवठादार/ठेकेदारांवर बंधनकारक राहिल.

१३. पुरविण्यात येणाऱ्या चाऱ्याचे ठेकेदाराने या कार्यालयाकडून नेमलेल्या कर्मचाऱ्याच्या समक्ष नेमून दिलेल्या वजन काट्यावर वजन करणेचे आहे. रिकामे ट्रक व चाऱ्यासह ट्रकचे वजन नेमून दिलेल्या वजन काट्यावर करावयाचे आहे. त्यासाठी येणारा खर्च चारा पुरवठा करणाऱ्या निविदाधारक ठेकेदाराने करावयाचा आहे.

१४. पुरवठा करणेत येणारा चारा जनावरांना खाण्यास योग्य नसलेस अथवा शासनाचे पशुसंवर्धन विभागाने विहीत केलेल्या निकषानुसार खाणेस योग्य नसलेस पुरवठा करणेत आलेला संपुर्ण चारा नाकारणेचे संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी सांगली यांना आहेत. त्यासाठी फेर वाहतुकीच्या खर्चाची कुठल्याही प्रकारची अदायगी केली जाणार नाही.

१५. चारा साठविण्याचे ठिकाण हे संबंधित तहसिलदार यांनी निश्चित केलेल्या ठिकाणीच चारा पुरवठा करावा लागेल. अन्यत्र केलेल्या चाऱ्या पुरवठ्याचे प्रदान केले जाणार नाहीत.

१६. कंत्राटदाराचे वाहन नादुरूस्त झाल्यास इंधनाभावी अथवा इतर कोणतेही कारणामुळे चारा पुरविण्याचे काम न करता वाहन उभे राहिल्यास त्याचे भाडे अथवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही. तसेच वाहनाची पर्यायी व्यवस्था तात्काळ करून चारा पुरवठ्याचे काम करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहिल.

१७. जिल्हाधिकारी सांगली यांना ठेकेदाराचा चारा पुरवठा असमाधानकारक आढळून आल्यास काम बंद करण्याचा अथवा तत्सम दुसरी कार्यवाही करण्याचा अधिकार राहील अशावेळी सुरक्षा ठेव, अनामत रक्कम जप्त करणे व नविन निविदा मागणेच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.

१८. चारा पुरविण्यासाठी किंवा वाहतुकीसाठी रोख अथवा अगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१९. उपरोक्त प्रक्रियेमध्ये ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे किंवा प्रतिनिधीने गैरव्यवहार किंवा काळाबाजार केल्यामुळे शासनाच्या होणाऱ्या नुकसानीची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करणेत येईल.

२०. ट्रकमध्ये चारा भरणे व चारा डेपोच्या ठिकाणी चारा खाली करणेची जबाबदारी ठेकेदाराची असेल.

२१. शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा व आदेश ठेकेदारावर बंधनकारक राहतील.

२२. चाऱ्याच्या पुरवठ्यात भेसळ (नमुन्या प्रमाणे नसलेला व काळाचारा) आढळून आल्यास भेसळ प्रतिबंधक तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार कार्यालयास राहतील आणि त्यासाठी येणारा जादा खर्च निविदाधारकांडून वसूल करणेत येईल.

२३. चारा डेपो व्यवस्थापन करणारी संस्था तसेच मंडल अधिकारी, विस्तार अधिकारी, पशुधन विकास अधिकारी व तलाठी, ग्रामसेवक, पशुधन पर्यवेक्षक यांचे प्रमाणपत्रानुसार बिले आदा करणेत येईल.

२४. प्रत्येक डेपोला पुरवठा करावयाचा चारा जिल्हा स्तरीय चारा डेपो व्यवस्थापन समिती ठरवून देईल.

२५. वरील अटींचा भंग केल्यास अथवा त्यानुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आल्यास होणारी दंडात्मक कारवाई व कंत्राट रद्द करण्याचे जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवलेले अधिकार मला/आम्हाला मान्य राहतील.

२६. चारा पुरवठयाबाबत (वाहतुकीसह/ वाहतुक ) मान्य निविदाकारासोबत करण्यात येणारे करारनाम्याचा नमुद कालावधी पुर्ण झालेवर ६महिनेनंतर पुरवठादाराविरुध्द काहीही तक्रार नसलेचे खातरजमा करून पुरवठादारा कडुन इंडेम्नीटी बाँण्ड घेवुन सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल.

२७. चारा उपलब्धता पाहूनच माझी/ आमची खात्री करूनच निविदा भरणेत आलेली आहे.

२८. ठेक्याच्या कालावधी मध्ये ठेकेदाराशिवाय इतर व्यक्ती किंवा संस्था यांचेकडून कोणत्याही दराने निविदेतील नमूद मालाची खरेदी करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी सांगली यांनी राखून ठेवलेले आहेत.

२९. कंत्राटदाराने निविदेत दिलेले दर निविदा उघडल्यापासून सन २०१२ मधील टंचाई परिस्थिती संपेपर्यत बंधनकारक रहातील.

वरील सर्व अटी व शर्ती मी/आम्ही काळजीपुर्वक वाचल्या असून त्या मला/आम्हाला मान्य आहेत.

स्थळ : सांगली

(निविदाधारकाची स्वाक्षरी)

निविदाधारकाचे नांव व संपूर्ण पत्ता

**टिप :** उपरोक्त अटी व शर्तीचा नमुना प्रत्येक पानावर निविदाधारकाने सही करून शिक्का मारून निविदेसोबत सादर केला पाहिजे.

# परिशिष्ट -२अ

## (निविदाकाराने भरावयाचे)

१. **निविदाकाराचे नाव, पत्ता आणि तारेचा पत्ता :**

२. **निविदाकाराची घटना :** निविदाकार एखदे हिंदु अविभक्त कुटुंब, घ्यावयाची भागीदारी संस्था किंवा नोंदणी केलेली भागीदारी संस्था किंवा एखादी मर्यादीत कंपनी आहे किंवा काय हे नमुद केले पाहीजे. सर्व भागीदार / संचालक / मालक / अविभक्त कुटुबांचा कर्ता याची नावे दिली पाहिजेत. प्रकट न केलेले कोणतेही भागीदार नाही असे प्रमाणित केले पाहिजेत. मर्यादीत कंपन्या यांच्या बाबतीत प्राधिकृत व भरणा केलेले भांडवल नमुद केले पाहिजें.

३. **ज्या धंदयात निविदाकार कामावर असेल तो धंदा :** निविदाकार किंवा निविदाकारांच्या संस्थेचे भागीदार ज्या धंदयात गुंतलेले असतील त्या धंदयंचे स्वरुप व त्या बरोबर मुख्य कार्यालय व शाखा कोणत्याही असल्यास कोठे आहेत या विषयीचा तपशिल नमुद करण्यात आला पाहिजे.

४. **कामाचा अनुभव :** यापूर्वी केलेल्या कामाचा अनुभव सविस्तरपणे द्यावा.

५. **परिवहन क्षमता :** निविदाकाराच्या मालकीच्या व नियंत्रणाखालील प्रत्येक मालमोटारीचा क्रमांक व प्रत्येक मालमोटारीची क्षमता दर्शवावी. माल मोटारीची मालकी व नियंत्रण या विषयीचा पुरवा पुरवावा.

६. **निविदाकारांच्या बँका :** ज्यांच्याशी निविदाकारांचे व्यवहार असतील व जी निविदाकारांच्या अर्थिक स्थिती विषयी प्रमाणित करु शकेल अशा बँकाची किंवा शाखांची नावे देण्यात आली पाहिजेत .

**दिनांक :-**
**ठिकाण :-** **निविदाकाराची सही**

## परिशिष्ट ३

**महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे करिता व त्यांचे वतीने जिल्हाधिकारी सांगली, यांचे कडून सांगली जिल्हयातील जत, आटपाडी, कवठेमहांकाळ, खानापूर-विटा, कडेगांव, तासगांव, पलूस, मिरज या तालुक्यामध्ये उघडण्यात येणाऱ्या चारा डेपोना माहे एप्रिल २०१२ ते ३० जून २०१२ अगर पावसाचे प्रमाण समाधानकारकरित्या होईपर्यंत आवश्यकतेनुसार (१) फक्त वाळलेला चारा (वाळलेला चारा/ ज्वारी अथवा हायब्रीड ज्वारीचा कडबा अथवा कडबा कुटटी ) पुरवठा करणेसाठी मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत .तसेच (२) वैरण विकास कार्यक्रमांतर्गत लागवड केलेला ओला चारा, मका, कडवळ अथवा शेतकऱ्यांनी लावेला चारा, ऊस इत्यादी शेतातुन तोडणे, वजन करणे, ट्रक मध्ये भरणेत येवुन तहसिलदार यांचे मागणीप्रमाणे चारा डेपोवर वाहतुक करणे, वजन करून शेतकऱ्यांना वाटप करणे हे सर्व काम करणेसाठीचे प्रती टन व प्रती किलोमीटर चे दर ठरविणेबाबतच्या निविदेच्या अटी व शर्ती.**

१. वाहन पुरविणेसाठी आदेश दिले नंतर वाहन धारकांने आदेशीत केलेल्या ठिकाणी आवश्यक ट्रक्स २४ तासाचे आत पुरविणेचे आहेत.

२. जेव्हा जिल्ह्यातील/ जिल्ह्याबाहेरील चारा उचल व जिल्ह्यातील चारा पुरवठा करणेबाबत आदेश दिला जाईल तेव्हा विनाखंड चारा वाहतुक करणेचा आहे. याबाबत निविदाधारकास कोणताही बदल मागता येणार नाही अथवा तक्रार करता येणार नाही.

३. किमान १० ट्रक स्वतःचे नांवे अथवा वाहतुकदारांशी करारनामा केलेले (नियंत्रणाखालचे) असणे आवश्यक आहे याशिवाय चारा डेपोच्या ठिकाणी पुरेसा व वेळेत चारा वाहतुक करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी वेळोवेळी निश्चित करतील तेवढी वाहने (ट्रक) उपलब्ध करून देणेबाबत हमीपत्र.विविधकार्यकारी सेवा सहकारी सोसायटी बाबतीत किमान दोन ट्रक स्वतःचे नावचे अगर सोसायटीचे नियंत्रणाखालचे अगर सोसायटीशी करारनामा केलेले असणे आवश्यक आहे.

४. निविदाधारकांस दररोज चारा वाहतुकीचे काम देणे जिल्हाधिकारी / तहसिलदार यांच्यावर बंधनकारक राहणार नाही.

५. वाहनावर काम करणारा चालक, मदतनीस यांचे पगार व भत्ते, इंधन, वाहनाची देखभाल व दुरूस्ती वरील खर्च, पथकर(टोल), स्थानिककर, जकात अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा खर्च वाहनधारकाने करावयाचा आहे. यासाठी शासनाकडून अगावू रक्कम अथवा परतावा मिळणार नाही.

६. वाहन केव्हा चालू व बंद करावयाचे याबाबत अंतिम अधिकार जिल्हाधिकारी/ तहसिलदार यांचेकडे राहतील याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

७. सक्षम अधिकारी यांनी ट्रक क्षमता प्रमाणित केलेले प्रमाणपत्र व वाहतुकीच्या किलोमिटर अंतराबाबत बांधकाम खात्याचे किंवा एसटी महामंडळाचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल.

८. प्रत्यक्ष चारा पुरवठा केलेल्या कामाबाबत ज्या ठिकाणी वाहन दिले जाईल त्या क्षेत्राचे मंडल अधिकारी, विस्तार अधिकारी, पशुधन विकास अधिकारी, डेपो चालक यांच्या सहीचा दैनंदिन चारा वाहतुक व पोहच दाखला संबंधित तहसिलदार यांचेकडे हजर करणेचा आहे.

९. चारा पुरवठासाठी केलेल्या प्रवासाची नोंदी लॉगबुकात नोंदवून संबंधित तहसिलदार यांचेकडून साक्षांकित करून घेणेचे आहे. सदरचे लागू पुरते उतारे किंवा प्रमाणपत्र हजर केले शिवाय पेमेंट (बिल) अदा केले जाणार नाही.

१०. अगावू भाडे मिळाले नाही अगर भाडेची देय रक्कम मिळाली नाही या कारणास्तव ट्रक बंद ठेवलेस निविदाधारकाचा ट्रक पुरविणेचा ठेका विना नोटीस रद्द करून बँक गॅरंटी / सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल.

११. तहसिलदार यांनी नियोजन ठरवून दिलेल्या वेळे प्रमाणे ट्रक चालू न ठेवल्यास निविदा ठेका विना नोटीस रद्द करण्यात येईल.

१२. निविदेमध्ये पुरविण्यात आलेल्या चालू स्थितीतील ट्रकची यादी व्यतिरिक्त ट्रकचा वापर करणेचा झालेस त्याबाबत जिल्हाधिकारी यांची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक राहिल.

१३. जिल्हाधिकारी, तहसिलदार वेळोवेळी जे निर्देश देतील त्याचे पालन करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहिल.

१४. वाहन यांत्रिकदृष्ट्या चांगल्यास्थितीत असून चारा वाहतुक कामासाठी वापरण्यास योग्य असल्याबाबतचे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकेट) व मालकीच्या व नियंत्रणाखालील ट्रकचे आर. सी. बुक साक्षांकित प्रत निविदाधारकाने हजर करणेचे आहे.

१५. ट्रकद्वारे चारा पुरवठा चालू असताना वाहनाची नादुरूस्ती झालेस निविदाधारकाने पर्यायी वाहनाची व्यवस्था करून निर्देशीत ठिकाणी चारा पुरवठा वेळेत करणेचे आहे.

१६. मोटार वाहतुक अधिनियम व नियमावतील सर्व तरतुदी निविदाधारकांस बंधन कारक राहतील.

१७. चारा पुरवठ्यासाठी उपयोगात आणलेल्या वाहनाचे काही अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी निविदाधारकावर राहिल. त्यासाठी शासनाकडून कोणतीही नुकसान भरपाई देणेचे जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.

१८. ट्रकच्या भाड्यापोटी द्यावयाची रक्कम ही शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतरच आदा करण्यात येईल काही कारणास्तव रक्कम मिळणेस विलंब झाला तरी त्याची मूळ रक्कमच अदा करणेत येईल. त्यावर कोणत्याही व्याजाची रक्कम निविदाधारकास मागता येणार नाही.

१९. निविदाधारकाकडून वरीलपैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास निविदेसोबत जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व आशा निविदा धारकाचे नांव काळ्या यादीत समाविष्ट करून त्याचे विरूध्द कायदेशीर कारवाई करणेत येईल तसेच सदरचे काम अन्य ठेकेदाराकडून करून घेतले जाईल त्यासाठी होणारा अतिरिक्त खर्च निविदाधारकाकडून एकरकमी महसुलाची थकबाकी म्हणून वसूल केला जाईल.

२०. याबाबत सर्व निर्णय घेणेचे अधिकार जिल्हाधिकारी, सांगली यांनी राखून ठेवलेले आहेत. चारा टंचाई परिस्थिती चारा पुरवठयाच्या कालावधीमध्ये बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, सांगली यांनी राखून ठेवला आहे.

२१. निविदा मान्य होताच निविदाधारकाने तात्काळ रू. १००/- च्या स्टँम्पपेपरवर शासनाशी करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास आपणास सदरकामाची आवश्यकता नाही असे समजून आपला ठेका रद्द केला जाईल याची नोंद घ्यावी.

२२. जिल्हयातील निर्दीष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही चारा डेपोवर पुरवठादारकास चारा पुरवावा लागेल. जिल्हयातील वेगवेगळया चारा डेपोकरिता वेगवेगळे वाहतूक दर देण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी. त्यामुळे चारा पुरवठयाचे दर व चारा वाहतूकीचे दर हे सर्वसमावेशक असावेत.

२३. जिल्हयातील निर्दीष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही चारा डेपोवर पुरवठादारकास चारा पुरवावा लागेल. जिल्हयातील वेगवेगळया चारा डेपोकरिता वेगवेगळे वाहतूक दर देण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी. त्यामुळे चारा पुरवठयाचे दर व चारा वाहतूकीचे दर हे सर्वसमावेशक असावेत.

२४. निविदेचे न्यूनतम दर हे नमूद करण्यात आलेले चारा पुरवठा दर व वाहतूक दर यांची एकत्रित बेरीज करुन आलेल्या दरांनुसार निश्चित करण्यात येतील.

२५. निविदा सोबत रुपये ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) बयाणा रक्कम जिल्हाधिकारी सांगली या नावाने धनाकर्ष (डी.डी.) द्वारे जमा करावी लागेल.सदरची अट वि.का. स. सेवा सोसायटीस लागू राहणार नाही.

२६. पुरवठा करण्यात आलेला चारा जनावरांना खाण्यास योग्य नसल्यास अथवा शासनाचे पशुसंवर्धन विभागाने विहीत केलेल्या निकषांनुसार खाण्यास योग्य नसल्यास पुरवठा करण्यांत आलेला संपूर्ण चारा नाकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी सांगली यांना आहेत. असा परत केलेला चारा परत नेण्याकरिता त्याबाबत कुठल्याही प्रकारची रक्कम अदायगी करण्यांत येणार नाही.

२७. सांगली जिल्हयातील निर्दिष्ट केलेल्या चाराडेपोच्या कोणत्याही गांवी व एकावेळी एकापेक्षा जास्त चारा डेपोंना एकाच वाहनांद्वारे चारा पुरवठा करण्यांसाठी उपयोगात आणल्या जाऊ शकेल.

२८. चाऱ्याचा पुरवठा तसेच चारा वहातुकीबाबत आवश्यकतेप्रमाणे आदेश देण्यात येतील. ही आवश्यकता जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी ठरवतील. याबाबत कंत्राटदारास एकूण किती चारा पुरवावा लागेल हे भविष्यात निर्माण होणाऱ्या चारा टंचाई परिस्थितीवर अवलंबून राहील .

२९. लागणाऱ्या चाऱ्याची नमूद केलेल्या चाऱ्याची गरज अंदाजे असुन त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्याचा आणि तसेच निविदा कालावधी कमी अथवा अधिक करणेचाही अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

३०. चारा पुरवठा करण्याकरिता वहातुकीच्या वाहनांची स्वच्छता राखणे, दुरुस्त ठेवणे व जनावरांना खाण्यास योग्य असा सकस चाऱ्याचा पुरवठा करणे यासाठी कंत्राटदार जबाबदार रहातील.

३१. चारा पुरवठा करताना होणाऱ्या नुकसानीबाबत जसे अपघात, आग लागणे किंवा इतर नैसर्गिक अथवा मानव निर्मित आपत्तीमुळे कंत्राटदाराच्या होणाऱ्या नुकसानीबाबतची भरपाई कंत्राटदाराला दिली जाणार नाही.

३२. चारा पुरवठा करताना होणाऱ्या नुकसानीबाबत जसे अपघात, आग लागणे किंवा इतर नैसर्गिक अथवा मानव निर्मित आपत्तीमुळे कंत्राटदाराच्या होणाऱ्या नुकसानीबाबतची भरपाई कंत्राटदाराला दिली जाणार नाही.

३३. ठेकेदारास मंजुर झालेला दर कोणत्याही कारणास्तव वाढवून दिला जाणार नाही.

३४. चारा साठविण्याचे ठिकाण हे संबंधित तहसिलदार यांचे मार्फत दर्शविण्यात येईल. दर्शविलेल्या ठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणी जर चारा पुरवठा कंत्राटदारांनी केला त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील व त्याचे भाडे दिले जाणार नाही.

३५. पुरविललेल्या चाऱ्याबाबत साठवणुक रजिस्टरमध्ये साठा नोंद तसेच प्रत्येक वाहनाची रोजनिशी जिल्हाधिकारी यांनी नेमुन दिलेले सक्षम अधिकारी हे ठरवतील पुरवठयांबाबत संबंधीत सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतरच देयक अदा केले जाईल. कंत्राटदारांनी स्पष्ट लेखी आदेश नसताना चारा पुरवठा केल्यास त्याबाबतचा मोबदला देता येणार नाही. चारा पुरवठा तसेच चारा वहातुकीबाबत शासनाकडून जसजसे अनुदान उपलब्ध होईल त्याप्रमाणे नियमांनुसार वितरीत करण्यात येईल.

३६. जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत प्रतिनिधी यांनी आदेश दिल्यानंतर चारा पुरवठा न केल्यास अथवा विलंबाने केल्यास प्रतिदिन रुपये १०,०००/- (अक्षरी दहा हजार फक्त) किंवा जिल्हाधिकारी निश्चित करतील त्या दराने दंड आकारुन निश्चित वसुल करण्यात येईल.

३७. जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर चारा पुरवठा न केल्यास अथवा चारा पुरवठयाचे काम असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास किंवा निविदेतील कोणत्याही अटीचा भंग केल्यास कंत्राटदारास दिलेले काम काढून घेणेचा अधिकार जिल्हाधिकारी यांचा राहील व चारा पुरवठयासाठी दुसऱ्या कंत्राटदाराकडून काम करुन घेण्यात येईल अथवा बाजारभावा प्रमाणे बाजारातुन चारा उपलब्ध करुन घेण्यात येईल. तसेच ठेकेदाराने दिलेल्या मालाचा दर व बाजारात खरेदी करताना दयावयाचा दर यातील तफावतीमुळे जिल्हाधिकारी सांगली यांना होणारे नुकसान ठेकेदाराच्या अनामत रकमेतुन वसुल केले जाईल. तसेच अनामत रकमेपेक्षा वसुलीची रक्कम जास्त असल्यास ती ठेकेदाराकडून महसुली थकबाकी म्हणून वसुल केली जाईल. त्या प्रित्यर्थ मंजुर दरापेक्षा जादा लागणारा जास्तीचा खर्च व फरकाची रक्कम मुळ कंत्राटदाराकडून वसुल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील .

३८. आवश्यकतेनुसार चारा पुरवठा आदेश देण्यात येतील. सांगली जिल्हयांत निर्माण होणाऱ्या चारा टंचाई परिस्थितीनुसार चारा डेपोमध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील .

३९. प्राप्त निवीदेपैकी कोणतेही / कोणतीही निवीदा पूर्णतः अथवा अंशतः स्विकारण्याचा अथवा अंशतः कोणतेही कारण न देता निवीदा रद्द करण्याचा अधिकार व हक्क जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवले आहेत .

४०. जर विधीग्राहय दोन किंवा अधिक निवीदेमध्ये दिलेले दर सारखेच असतील तर याबाबत जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

४१. कंत्राटदाराचे वाहन नादुरुस्त झाल्यास, इंधन अभावी अथवा इतर कोणतेही कारणामुळे चारा पुरविण्याचे काम न करता वाहन उभे राहील्यास त्याचे भाडे अथवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही .

४२. जिल्हाधिकारी सांगली यांना ठेकेदाराचा चारा पुरवठा असमाधानकारक आढळून आल्यास बंद करण्याचा अथवा तत्सम दुसरी कार्यवाही करण्याचा अधिकार राहील अशावेळी सुरक्षा ठेव, अनामत रक्कम जप्त करणे व नविन निविदा मागणेच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.

४३. चारा पुरवठा डेपोवर ठेवलेल्या नमुन्या प्रमाणे चारा पुरवठयाचे बंधन राहील.

४४. चारा पुरवठा डेपोवर ठेवलेल्या नमुन्या प्रमाणे चारा पुरवठयाचे बंधन राहील.

४५. जिल्हयासाठी नमुद केलेल्या चाऱ्याची गरज, कपात किंवा वाढ करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी /तहसिलदार यांना राहतील.

४६. निविदे सोबत शासकीय अटी शिवाय ठेकेदारांनी मांडलेली इतर कोणतीही अट स्विकारण्यात येणार नाही. व तसा उल्लेख केल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

४७. शासकिय नियमावलील वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार अथवा प्रशासकीय आदेशा प्रमाणे होणाऱ्या बदला नुसार जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांनी केलेल्या सुचना व अटीचे पालन करणे पुरवठादार / ठेकेदारांवर बंधनकारक राहील.

४८. पुरविण्यात येणाऱ्या चाऱ्याचे ठेकेदाराने या कार्यालयाकडून नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या समक्ष नेमून दिलेल्या वजन काटयावर वजन करणेचे आहे. रिकामे ट्रक व चाऱ्यासह ट्रकचे वजन नेमुन दिलेल्या वजन काटयावर करावयाचे आहे. चाऱ्याचा पुरवठा सकाळी ८.०० ते सायं. ५.०० या वेळेतच करावा लागेल. त्यासाठी येणारा खर्च चारा पुरवठा करणाऱ्या निविदा धारक ठेकेदाराने करावयाचा आहे.

४९. चारा पुरविण्यासाठी किंवा वाहतूकीसाठी रोख अथवा आगावू रक्कम दिली जाणार नाही. पुरवठा आदेशा प्रमाणे चारा पुरवठा पूर्ण झाल्यानंतरच त्याचे बिल कार्यालयात सादर करावे . बिलाची रक्कम अनुदान उपलब्ध झालेचे नंतर अदा करणेत येईल किंवा टप्प्याटप्प्याने अनुदान उपलब्ध झाल्यास त्या प्रमाणे बिले अदा केली जातील. बिलाची रक्कम उशिरा दिले बददल शासन भरपाईस जबाबदार राहणार नाही.

५०. उपरोक्त प्रक्रिये मध्ये ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे किंवा प्रतिनिधी गैरव्यवहार किंवा काळा बाजार केलेमुळे शासनाच्या होणाऱ्या नुकसानीची रक्कम ठेकेदारकडून वसुल करणेत येईल.

५१. ठेकेदाराकडून वसुल करावयाची रक्कम त्यांच्या जंगम मालमत्तेतुन रिझर्व्ह बँकेच्या प्रचलित व्याजासहीत वसुल करण्याचे अधिकार आहेत.

५२. चारा पुरवठयाचे काम एकास किंवा विभागून देणेत येईल.

५३. नियमानुसार कमीत कमी तीन निविदा प्राप्त झालेनंतरच त्याबाबत निविदा समिती समोर कार्यवाही करणेत येईल.

५४. चाऱ्याच्या पुरवठयात भेसळ (नमुन्या प्रमाणे नसलेला व काळा चारा) आढळून आल्यास भेसळ प्रतिबंधक तरतूदी नुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार कार्यालयास राहतील आणि त्यासाठी येणारा जादा खर्च निविदाधारकाकडून वसूल करणेत येईल.

५५. अयशस्वी निविदाधारकांची अनामत रक्कम यशस्वी निविदाधारकांची निविदा अंतिमतः मान्य झालेनंतर व करारनामा करणेत आल्यानंतर परत करणेत येईल.

५६. ट्रकमध्ये चारा भरणे व चारा डेपोच्या ठिकाणी चारा खाली करणेची जबाबदारी ठेकेदाराची असेल.

५७. ट्रकमध्ये चारा भरणे व चारा डेपोच्या ठिकाणी चारा खाली करणेची जबाबदारी ठेकेदाराची असेल.

५८. शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा व आदेश ठेकेदारावर बंधनकारक राहतील.

५९. प्रत्येक चारा डेपोमध्ये चाऱ्याचे नमुना ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणेच चाऱ्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

६०. प्रत्येक डेपोला पुरवठा करावयाचा चारा जिल्हयातील चारा डेपो व्यवस्थापन समिती ठरवून देईल.

६१. निविदाधारकाने त्याने दिलेल्या करारनाम्यातील कुठल्याही अटीचा भंग केल्यास त्याची अनामत रक्कम आणि जेवढे दिवस चाऱ्याचा पुरवठा केला तेवढया दिवसाचे भाडे जप्त करण्यात येईल. वरील अटी व शर्तीमध्ये फेरबदल करण्याचा, काही नवीन अटी व शर्ती समाविष्ट करण्याचा तसेच काही अटी व शर्ती शिथिल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहे.

६२. त्याचा भंग केल्यास अथवा त्यानुसार कार्यवाही न केल्यास होणारी दंडात्मक कार्यवाही व असे आढळून आल्यास कंत्राट रद्द करण्याचे जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवलेले अधिकार मला / आम्हाला मान्य राहील.

६३. निविदा धारकाने चारा ज्या वाहनातुन चारा डेपो पर्यंत वाहतुक करुन पोहोच करणार आहे. तेथे सी. सी. टी व्ही. द्वारे शुटींग करणे आवश्यक आहे. तसेच शेतकरी यांना चारा देते वेळे त्यांच्या अंगठयाचे बायोमॅट्रीक करणे आवश्यक आहे.

६४. चारा डेपो व्यवस्थापन करणारी संस्था, तसेच मंडल अधिकारी, तलाठी व पशुधन पर्यवेक्षक यांच्या प्रमाणपत्र
नुसार बिले अदा करणेत येतील.

६५. चारा उपलब्ध पाहूनच माझी / आमची खात्री करुनच निविदा भरणेत आलेली आहे.

**वरील सर्व १ ते ६५ अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला /आम्हाला मान्य आहेत.**

**स्थळ : सांगली**

**निविदाधारकाची स्वाक्षरी :** ------------------------------------------

**निविदाधारकाचे नाव :** ------------------------------------------

**व संपूर्ण पत्ता :** ------------------------------------------

**टिप : उपरोक्त अटी व शर्तीचा नमुना प्रत्येक पानावर निविधारकाने सही करुन शिक्का मारुन निविदेसोबत सादर केला पाहिजे**

**लिफाफा क्र. १ मध्ये (तांत्रिक लिफाफा) सादर करावयाच्या कागपत्रांची सुची.**

| अ. नं. | कागदपत्रांची सुची |
|---|---|
| १ | बयाणा रक्कम रु. ५०,०००/- राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्ष (डी.डी.) स्वरुपात मा. जिल्हाधिकारी सांगली यांचे नांवे देणे |
| २ | व्यवसायाचे नोंदणीप्रमाणपत्र |
| ३ | अद्यावत विक्रीकर / व्हॅट प्रमाणपत्र |
| ४ | अनुभवाचे प्रमाणपत्र |
| ५ | किमान १० ट्रक स्वतःच्या नावे अथवा वाहतुकदाराशी करारनामा केलेले (नियंत्रणाखालचे) असणे आवश्यक आहे. |
| ६ | शासनाचे इतर कोणत्याही कामामध्ये काळया यादीत समाविष्ठ न केल्या बद्दल शपथपत्र |
| ७ | निविदा मंजूर झाल्यास अटी / शर्ती प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम रु. २ लाखाचा धनाकर्ष (डी.डी.) व १० लाखाचे हैसियत प्रमाणपत्र देण्याबाबत शपथपत्र |
| ८ | मालकीच्या व नियंत्रणाखाली ट्रकचे आर. सी. बुक व फिटनेस प्रमाणपत्राची (सक्षम अधिकाऱ्यांचे) साक्षांकित प्रत |
| ९ | निविदे सोबत सादर केलेले स्वतःच्या मालकीचे ट्रक व नियंत्रणाखाली ट्रक दुसऱ्या जिल्हयातील तसेच इतर कोणत्याही वाहतुकीच्या कंत्राट / करारनाम्यासाठी उपयोगात आणले नसल्या संबंधितचे शपथपत्र |
| १० | नियंत्रणाखाली ट्रक मालकाचे चारा वाहतुकीसाठी ट्रक उपलब्ध करुन देण्या संबंधिचे शपथपत्र |
| ११ | अटी व शर्तीच्या प्रत्येक पानावर स्वाक्षरी केलेला नमूना |
| १२ | अट क्र. १ ही विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी सेवासोसायटीस लागू राहणार नाही . |
| १३ | अट क्र. ५ विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी सेवासोसायटीचे बाबतीत किमान दोन ट्रक स्वतःचे नावचे अगर सोसायटीचे नियत्रणाखालचे अगर सोसायटीसी करारनामा केलेले असणे आवश्यक आहे. |
| १४ | अट क्र. ७ विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी सेवासोसायटीस अनामत रक्क्म म्हणून किमान रुपये ५० हजार धनाकर्ष दयावा लागेल व रुपये २ लाखाचे हैशियत प्रमाणपत्र देण्याबाबतचे शपत पत्र दयावे लागेल. |

## प्रपत्र तीन

**लिफाफा क्र.२ (व्यापारी लिफाफा)**

**निनिवदाधारकाचे नाव-**

**संपूर्ण पत्ता -**

**तक्ता : १** **वाळलेला चारा कडबा अथवा कडबा कुटटी चाऱ्याचा वाहतुकीसह दर** **तालुक्याचे नांव**

| अ. क्र. | चारा प्रकार | पुरवठादाराने नमूद करावयाचे दर | | एकूण (स्तंभ ३+४) |
|---|---|---|---|---|
| | | चाऱ्याचा दर (प्रति टन ) (अक्षरी व अंकामध्ये) | चारा वाहतूकीचा दर (प्रति टन साठी ) (अक्षरी व अंकामध्ये) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | वाळलेला शाळू ज्वारीचा नवीन कडबा | | | |
| २ | वाळलेला हायब्रीड ज्वारीचा नवीन कडबा | | | |
| ३ | वाळलेल्या गवताचा चाप | | | |
| ४ | कडबा कुटी | | | |

**तक्ता : २** **फक्त चारा वाहतुकीचा दर**

| अ. नं. | चाऱ्याचा प्रकार | फक्त वाहतुकीचादर प्रति टन / कि. मी. |
|---|---|---|
| १ | वाळलेला चारा | |

टिप : १) चाऱ्याचा प्रति मे.टन दर व वाहतूकीचा प्रति मेट्रीक टन दर हा अंकामध्ये वअक्षरी सुस्पष्टपणे वेगवेगळा दर्शविण्यात यावा निविदा मंजूरीसाठी स्तंभ ३ व४ मधील दर देणे आवश्यक आहे. निविदेतील न्यूनतम दर हे चाऱ्याच्या प्रति मे.टन दर व वाहतूकीचा प्रति मे.टन दर यांची बेरीज करुन येणाऱ्या एकत्रित रक्कमेवर निश्चित करणेत येईल.

२) निविदाकारास एका पेक्षा जास्त तालुक्यात करीता दरपत्रके सादर करावयाची असलेस प्रत्येक तालुक्याकरीता वेगळे दरपत्रकाचे परिशिष्ट भरुन दयावे.

**ठिकाण :** **निविदा सादर करणाऱ्याचे संपूर्ण**
दिनांक : / /२०१२ नाव व स्वाक्षरी

# प्रपत्र तीन

## लिफाफा क्र.२अ (व्यापारी लिफाफा)

**निनिवदाधारकाचे नाव-**

**संपूर्ण पत्ता -**

**तक्ता : १** वैरण विकास कार्यक्रमांतर्गत लागवड केलेला ओला चारा, मका, कडवळ अथवा शेतकऱ्यांनी लावलेला चारा, ऊस इत्यादी शेतातुन तोडणे, वजन करणे, ट्रक मध्ये भरणेत येवुन तहसिलदार यांचे मागणीप्रमाणे चारा डेपोवर वाहतुक करणे, वजन करून शेतकऱ्यांना वाटप करणे हे सर्व काम करणेसाठीचे प्रती टन व प्रती किलोमीटर चे दर ठरविणेबाबत

**तालुक्याचे नाव-**

| अ. क्र. | चारा प्रकार | पुरवठादाराने नमूद करावयाचे दर | | एकूण (स्तंभ ३+४) |
|---|---|---|---|---|
| | | चाऱ्याचा दर (प्रति टन ) (अक्षरी व अंकामध्ये) | चारा वाहतूकीचा दर (प्रति टन प्रति कि.मी साठी ) (अक्षरी व अंकामध्ये) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | वैरण विकास कार्यक्रमांतर्गत लागवड केलेला ओला चारा, मका, कडवळ ,शेतातुन तोडणे, वजन करणे, ट्रक मध्ये भरणेत येवुन तहसिलदार यांचे मागणीप्रमाणे चारा डेपोवर वाहतुक करणे, वजन करून शेतकऱ्यांना वाटप करणे हे सर्व काम करणेसाठी | | | |
| २ | शेतकऱ्यांनी लावलेला चारा, ऊस शेतातुन तोडणे, वजन करणे, ट्रक मध्ये भरणेत येवुन तहसिलदार यांचे मागणीप्रमाणे चारा डेपोवर वाहतुक करणे, वजन करून शेतकऱ्यांना वाटप करणे हे सर्व काम करणेसाठी | | | |

**तक्ता : २** **फक्त चारा वाहतुकीचा दर**

| अ. नं. | चाऱ्याचा प्रकार | फक्त वाहतुकीचादर प्रति टन / कि. मी. |
|---|---|---|
| १ | ओला चारा | |

**टिप** : १) चाऱ्याचा प्रति मे.टन दर व वाहतूकीचा प्रति मेट्रीक टन दर हा अंकामध्ये वअक्षरी सुस्पष्टपणे वेगवेगळा दर्शविण्यात यावा निविदा मंजूरीसाठी स्तंभ ३ व४ मधील दर देणे आवश्यक आहे. निविदेतील न्यूनतम दर हे चाऱ्याच्या प्रति मे.टन दर व वाहतूकीचा प्रति मे.टन दर यांची बेरीज करुन येणाऱ्या एकत्रित रक्कमेवर निश्चित करणेत येईल.

**ठिकाण :** **निविदा सादर करणाऱ्याचे संपूर्ण**

दिनांक : / /२०१२ नाव व स्वाक्षरी